# कृषि दिनदर्शिका
# २०२६



# वसंतराव नाईक
# मराठवाडा कृषि विद्यापीठ, परभणी




**संपादक**



**डॉ.राजेश कदम**
विभाग प्रमुख, कृषि विस्तार शिक्षण
वनामकृवि, परभणी

**मार्गदर्शक**



**डॉ. इन्द्र मणि**
कुलगुरु
वनामकृवि, परभणी

**प्रकाशक**



**डॉ.राकेश अहिरे**
संचालक, विस्तार शिक्षण
वनामकृवि, परभणी


संपादक सहाय्य : श्री. राहुल सु. औंधकर (वरिष्ठ संशोधन सहाय्यक, वनामकृवि, परभणी)
विद्यापीठ संकेत स्थळ: www.vnmkv.ac.in विद्यापीठाच्या बातम्यांसाठी पहा www.promkvparbhani.blogspot.com
कृषि माहिती वाहिनी: (०२४५२) २२९०००, मो.नं. ८३२९४३२०९७, ई-मेल: deevnmkv@gmail.com, फोन: (०२४५२) २२८६०१

Follow us on: @vnmkv

किंमत : रु ६०/-



# वसंतराव नाईक मराठवाडा कृषि विद्यापीठ, परभणी


• कृषि माहिती वाहिनी : (०२४५२) २२९०००, मो. ८३२९४३२०९७, ई-मेल : deevnmkv@gmail.com, deemau@rediffmail.com • फोन : (०२४५२) २२८६०१
• विद्यापीठ संकेत स्थळ : www.vnmkv.ac.in विद्यापीठाच्या बातम्यांसाठी पहा www.promkvparbhani.blogspot.com /vnmkv /vnmkv /user/vnmkv


## १ जानेवारी — पौष/माघ शके १९४७ — २०२६

| वार | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| र रविवार | | पौष कृ. १<br>भगवान बाबा पुण्यतिथी -भगवानगड (पाथर्डी)<br>**४** | पौष कृ. ८<br>**११** | पौष अमावास्या<br>मौनी अमावास्या (जैन)<br>अमावास्या समाप्ती उ.रात्रौ ०१.२१<br>**१८** | माघ शु. ७ शुभ दिवस<br>रथसप्तमी<br>**२५** |
| सो सोमवार | | पौष कृ. २ शुभ दिवस<br>(रात्रौ ८.५४ प.)<br>**५** | पौष कृ. ९ शुभ दिवस<br>स्वामी विवेकानंद जयंती<br>राष्ट्रीय युवा दिन<br>राजमाता जिजाऊसाहेब भोसले जयंती (तारखेप्रमाणे)<br>**१२** | माघ शु. १ शुभ दिवस<br>माघ मासरंभ<br>**१९** | माघ शु. ८<br>प्रजासत्ताक दिन<br>दुर्गाष्टमी<br>**२६** |
| मं मंगळवार | | पौष कृ. ३/४<br>अंगारक संकष्ट चतुर्थी<br>चंद्रोदय ०८.५३<br>**६** | पौष कृ. १०<br>भोगी<br>धनुर्मास समाप्ती<br>**१३** | माघ शु. २ शुभ दिवस<br>चंद्रदर्शन<br>(रात्रौ ०८.०० प.)<br>**२०** | माघ शु. ९ शुभ दिवस<br>(स.११.०८ प.)<br>**२७** |
| बु बुधवार | नूतन वर्षाभिनंदन | पौष कृ. ५ शुभ दिवस<br>**७** | पौष कृ. ११<br>षट्तिला एकादशी<br>मकरसंक्रांती<br>संक्रमण पुण्यकाल दु.३.०६ ते साय. ५.५०<br>**१४** | माघ शु. ३ शुभ दिवस<br>भारतीय माघ मासारंभ<br>(सायं.६.५८ नं.)<br>मुस्लिम शाबान मासारंभ<br>**२१** | माघ शु. १० शुभ दिवस<br>लाला लजपतराय जयंती<br>(स.९.२६ नं.)<br>**२८** |
| गु गुरूवार | पौष शु. १३ शुभ दिवस<br>प्रदोष<br>ख्रिस्ताब्द २०२६ प्रारंभ<br>**१** | पौष कृ. ६<br>**८** | पौष कृ. १२<br>**१५** | माघ शु. ४ शुभ दिवस<br>विनायक चतुर्थी<br>(दु.२.४० प.)<br>श्रीगणेश जयंती<br>**२२** | माघ शु. ११ शुभ दिवस<br>जया एकादशी<br>(दु. १.५५ नं.)<br>भीष्मद्वादशी<br>**२९** |
| शु शुक्रवार | पौष शु. १४ शुभ दिवस<br>(सायं. ६.५४ प.)<br>पौर्णिमा प्रारंभ सायं. ०६.५४<br>**२** | पौष कृ. ६<br>**९** | पौष कृ. १३<br>धर्मवीर छत्रपती संभाजी महाराज राज्याभिषेक दिन<br>**१६** | माघ शु. ५ शुभ दिवस<br>वसंत पंचमी<br>जगद्गुरू तुकाराम महाराज जयंती<br>नेताजी सुभाष जयंती<br>हिंदुहृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे जयंती<br>**२३** | माघ शु. १२ प्रदोष शुभ दिवस<br>महात्मा गांधी पुण्यतिथी<br>(सायं. ४.५८ नं.)<br>हुतात्मा दिन<br>**३०** |
| श शनिवार | पौष पार्णिमा शुभ दिवस<br>महिला मुक्तिदिन<br>राजमाता जिजाऊसाहेब भोसले जयंती (तिथीप्रमाणे)<br>सावित्रीबाई फुले जयंती<br>पौर्णिमा समाप्ती दुपारी ०३.३३<br>**३** | पौष कृ. ७ शुभ दिवस<br>कालाष्टमी<br>**१०** | पौष कृ. १४<br>शब्बे मिराज<br>अमावास्या प्रारंभ उ.रात्रौ ००.०३<br>**१७** | माघ शु. ६ शुभ दिवस<br>**२४** | माघ शु. १३/१४<br>श्री विश्वकर्मा जयंती<br>**३१** |

............ १
............ २
............ ३
............ ४
............ ५
............ ६
............ ७
............ ८
............ ९
............ १०
............ ११
............ १२
............ १३
............ १४
............ १५
............ १६
............ १७
............ १८
............ १९
............ २०
............ २१
............ २२
............ २३
............ २४
............ २५
............ २६
............ २७
............ २८
............ २९
............ ३०
............ ३१

### या महिन्यातील करावयाची कामे

- बागायती ज्वारी, करडई, हरभरा, सुर्यफुल या पिकांना फुलोरा व दाणे भरतेवळी पाणी द्यावे
- गहु पिकास शिफारशीनुसार खते देऊन पाणी द्यावे. तांबेरा रोगाचा आणि उंदराचा बंदोबस्त करावा.
- करडईवरील मावा व हरभऱ्यावरील घाटे अळीचे वेळीच नियंत्रण करावे.
- सूरू ऊस लागवडीसाठी रोगमुक्त बेण्याची निवड करावी व भुईमूग, गवार, कांदा ही आंतरपिके घ्यावीत.
- सुरू ऊस लागवडीच्या वेळी शिफारशीनुसार खताच्या मात्रा द्याव्यात. (२५० : ११५ : ११५) नत्र, स्फुरद, पालाश किलो प्रती हेक्टरी.
- उन्हाळी भुईमूगाची पेरणी करावी, शिफारशीनुसार जिवाणू व रासायनिक खते द्यावीत.
- उन्हाळी भाजीपाला पिकाची लागवड करावी.
- टरबुजाच्या पिकास लागवडीनंतरच्या खताचा हप्ता शिफारशीनुसार द्यावा व लाल भुंग्या पासून पिकाचे संरक्षण करावे.
- आंबा मोहोराचे तुडतुडे, भुरी या किडी व रोगापासून संरक्षण करावे.
- उन्हाळ्यात जनावरांना हिरव्या चाऱ्यासाठी निळवा, मका, ज्वारीचे सुधारित वाणाची निवड करून दुसऱ्या पंधरवाड्यात पेरणी करावी.
- द्राक्ष पिकावर येणारी किडी व रोगाचे शिफारशीनुसार रोग प्रतिबंध औषधाचा वापर करून नियंत्रण करावे.
- खोडवा उसातील पाचट जाळु नये. कुट्टी करून सरीमध्ये व्यवस्थित लावावी.
- कापुस फरदड घेऊ नये. पऱ्हाटी काढून खोल नांगरट करावी.



कृषि महाविद्यालय, परभणी
स्थापना : सन १९५६ * दूरध्वनी : (०२४५२) २३३००७



ज्वारी : परभणी शक्ती



ज्वारी : परभणी ज्योती



ज्वारी : परभणी मोती

### महत्त्वाच्या नोंदी

# ग्रामीण शेतकरी महिलांसाठी व्यवसायाच्या सुवर्ण संधी



डॉ.नीता गायकवाड
विभाग प्रमुख
मो. ८६६८८४४१३३
सामुदायिक विज्ञान महाविद्यालय, वनामकृवि, परभणी

भारतातील ग्रामीण शेतकरी महिला बहुतांशी शेती कामे करतात त्या जी कामे करतात त्यातुन अर्थार्जन फारस होत नाही त्यामुळे त्यांचे आर्थिक व सामाजिक परावलंबन प्रकर्षाने जाणवते. तसेच कुठल्याही कामाचे श्रेय तिला दिले जात नाही. म्हणूनच ग्रामीण महिलांना आर्थिकदृष्ट्या सक्षम करणे महत्वाचे ठरते व त्यांना त्याची जाणीव करून देण आवश्यक आहे. उद्योग सुरू करतांना कल्पकतेची गरज आहे कारण ग्राहकांची गरज अचुक ओळखणे महत्वाचे आहे. उद्योग निवडतांना आवड हा पहिला निकष असायला हवा. आपण ज्यात रमू शकू, आनंद मिळवू शकू, नव्या कल्पना आणी, तोच उद्योग निवडावा. म्हणजे ख-या अर्थाने उद्योजक बनण्याची अर्धी लढाई तुम्ही जिंकली आहे असे होत आवडीमुळे जीव ओतून आपण काम करतो. उद्योगामधील खाचा-खोचा, ठोकताळे, बारकावे, मात्र अनुभवातून शिकावे लागतात. कोणताही व्यवसाय सुरू करतांना छोट्या प्रमाणात सुरू करावा. हळूहळू त्याची व्याप्ती वाढवावी अशी खुप कामे तसेच व्यवसाय आपल्याला पाहावयास मिळतात जी एक स्त्री आपल्या घरगुती जबाबदारींचे पालन करून देखील करताना आपणास दिसुन येते. स्वतःच्या घरात तसेच संसारात आपला स्वःताचा हातभार ती लावण्याचा प्रयत्न करत असते. आज पाहावयास गेले तर कित्येक स्त्रीया आज पुरूषांच्या बरोबरीने खांद्याला खांदा लावुन नोकरी करत आहेत तसेच स्वःताचा उद्योग व्यवसाय देखील चालवत आहेत.

कोणताही व्यवसाय असो, त्यात महत्त्वाचे म्हणजे विक्री. मग आपण एखादे उत्पादन किंवा सेवा देऊ शकतात. त्यामुळे कोणताही व्यवसाय करायचा असेल तर सर्वात आधी लोकांच्या गरजा काय आहे आणि आपण लोकांना काय उपलब्ध करू शकतो, ह्याचा अभ्यास करणे महत्वाचे आहे. याच अभ्यासातुन कोणता व्यवसाय करावा याचे उत्तर आपोआपच मिळेल. नवीन उद्योग करायचा नियोजन केले तर त्यासाठी भांडवल, मार्केटिंग स्किल, अनुभव ह्या सर्व गोष्टींची आवश्यक्ता असते. पण असे काही व्यवसाय आहेत कि जिथे ह्या गोष्टी नसल्या, तरी तुम्ही चांगला व्यवसाय करू शकता. मुख्यतः ग्रामीण भागात कमी गुंतवणुकी मध्ये तुम्ही बरेच उद्योग सुरू करू शकता. ज्यामुळे त्या आर्थिक दृष्ट्या सक्षम होऊ शकतात. यामध्ये कमी गुंतवणूक आणि कमी कौशल्याच्या आवश्यकतेसह व्यवसायांची निवड केली जाऊ शकते, ज्यामुळे महिलांना त्यांच्या घरच्या कामांबरोबर व्यावसायिक आयुष्य सुरु करण्याची संधी मिळू शकते.



**ग्रामीण भागात छोटे व्यवसाय सुरू करण्याच्या काही सुवर्ण संधी खालील प्रमाणे आहेत**

**दूध उत्पादन व विक्री :** ग्रामीण भागात दूध उत्पादन एक चांगला व्यवसाय ठरू शकतो. त्याठिकाणी गाय, बकरी, किंवा म्हशीचे पालन करून दूध विक्री करता येते. दूध उत्पादनासाठी विशेष प्रशिक्षणाची आवश्यकता नसते, परंतु योग्य काळजी घेणे आणि चांगली देखभाल करणे महत्त्वाचे आहे. दूध व्यवसाय हा एक फायदेशीर आणि कायमस्वरूपी उत्पन्न देणारा व्यवसाय आहे. भारतात दूध आणि दुग्धजन्य पदार्थांना मोठी मागणी असल्याने हा व्यवसाय लहान, मध्यम, किंवा मोठ्या प्रमाणावर यशस्वीपणे करता येतो. गायी किंवा म्हशींच्या पालनातून दूध उत्पादन करून स्थानिक बाजारपेठेत किंवा मोठ्या कंपन्यांना दूध पुरवठा करता येतो. दूध व्यवसाय सुरू करताना काही बाबी लक्षात घेतल्या पाहिजेत:- गायी/म्हशींची संख्या निश्चित करा. दूध विक्री किंवा दुग्धजन्य पदार्थ निर्मितीसाठी योजना ठरवा. योग्य जागेची निवड करा (शेतकरी भाग किंवा दूध संकलनासाठी योग्य क्षेत्र).

**गायी/म्हशींची निवड गोठ्याची व्यवस्था :-** जास्त दूध उत्पादन देणाऱ्या प्रजाती निवडा: गायींसाठी: जर्सी, होलस्टीन फ्रिजियन, गीर. म्हशींसाठी: मुर्रा, जाफराबादी. प्रजाती निवडताना दुधाचे प्रमाण, आरोग्य, आणि देखभाल खर्च लक्षात घ्या. स्वच्छ आणि हवादार गोठा तयार करा. प्राणी ताणमुक्त राहतील याची काळजी घ्या.पिण्यासाठी स्वच्छ पाणी आणि खाद्य पुरवठ्याची व्यवस्था करा.

**दूध व्यवसायातून उत्पन्नाचे प्रकार :** १. कच्चे दूध विक्री: स्थानिक बाजारपेठ किंवा दुध डेअरींना पुरवठा. २. दुग्धजन्य पदार्थ दही, तूप, पनीर, लोणी, दूध पावडर, खवा यांचे उत्पादन व विक्री. ३. गायी/म्हशीचे शेणखत: शेतीसाठी विक्री. ४. प्रजनन व्यवसाय: जास्त दूध देणाऱ्या प्रजातींच्या प्रजोत्पत्तीचा व्यवसाय.

**फायदे:-** दूध उत्पादनाच्या व्यवसायात कमी गुंतवणूक असली तरी नियमित उत्पन्न मिळवता येते. भारतात दूध आणि दुग्धजन्य पदार्थांना सतत मागणी. नैसर्गिक खत आणि शेतीसाठी पूरक उत्पन्न. कमी भांडवलात व्यवसाय सुरू करून हळूहळू विस्तार करता येतो. ग्रामीण भागातील महिलांसाठी दूध उत्पादन हा एक अत्यंत महत्त्वाचा आणि लाभदायक व्यवसाय आहे.दूध आणि दुग्धजन्य पदार्थांची मागणी दिवसेंदिवस वाढत आहे. महिलांना गायी, बकरी किंवा म्हशींचे पालन सुरू करून दूध विक्री करण्याची संधी मिळू शकते.

**पापड व्यवसाय :-** पापड ही अशी गोष्ट आहे की ती जवळ जवळ प्रत्येक घरांमध्ये खूपच मोठ्या प्रमाणामध्ये वापरली जाते. सध्याच्या काळामध्ये बाजारामध्ये पापडा ला खूपच मोठ्या प्रमाणामध्ये मागणी आहे. त्यामध्ये साधे पापड, मसाला पापड, तळलेले पापड इत्यादी अनेक प्रकारचे पापड आपल्याला हॉटेल्समध्ये तसेच धाब्यांवर दिसून येतात तसेच मोठ्या प्रमाणामध्ये विकले देखील जातात. पापड व्यवसाय मध्ये महिलांचे योगदान हे खूपच मोठ्या प्रमाणामध्ये आहे. बहुतेक महिला भारत देशामध्ये हे काम स्वतःच्या घरामध्ये सुरू करत असतात. महिला सक्षमीकरणासाठी हे एक चांगले प्रकारचे योगदान आहे. पापड व्यवसाय हा कमी गुंतवणुकीतून सुरू करता येणारा व लवकर नफा मिळवून देणारा व्यवसाय आहे. घरगुती पातळीवर तसेच लघुउद्योग म्हणून हा व्यवसाय यशस्वीरीत्या करता येतो. आपल्या भारत देशामध्ये पापड ला खूपच मोठ्या प्रमाणामध्ये मागणी आहे, कारण पापड हा प्रत्येक कुटुंबाच्या जेवणाचा एक महत्त्वाचा भाग आहे.

**फायदे :** कमी गुंतवणुकीत सुरू करता येतो. घरबसल्या सुरू करता येतो. नेहमी मागणी असलेला उत्पादन. महिलांसाठी स्वावलंबी होण्याची चांगली संधी. प्रधानमंत्री मुद्रा योजना अंतर्गत भांडवल मिळू शकते. महिला उद्योजकांसाठी विशेष अनुदान. स्थानिक लघुउद्योग खात्याकडून मार्गदर्शन व प्रशिक्षण. पापड व्यवसायाने अनेक लोकांना आर्थिकदृष्ट्या सक्षम केले आहे. योग्य नियोजन, दर्जेदार उत्पादन, आणि चांगल्या मार्केटिंगद्वारे आपण या व्यवसायात नफा मिळवू शकता. लिजत पापड हे एक उत्कृष्ट उदाहरण आहे ज्याने महिला सक्षमीकरण आणि स्वयंपूर्ण व्यवसायाच्या संकल्पनेला



एक वेगळी उंची दिली आहे. १९५९ साली ७ गृहिणींनी मिळून ८० रुपये भांडवलावर हा व्यवसाय सुरू केला. या व्यवसायामध्ये महिलांना रोजगार देऊन त्यांच्या कौशल्याचा उपयोग करून आर्थिक स्वावलंबनाचे माध्यम निर्माण करण्यात आले.

**पिठाच्या गिरणीचा व्यवसाय:-** हा ग्रामीण आणि शहरी भागांमध्ये मोठ्या प्रमाणावर यशस्वी ठरतो, कारण भारतात घरगुती पिठाला नेहमीच मागणी असते. या व्यवसायात कमी गुंतवणुकीतून सुरुवात करता येते आणि तो कायमस्वरूपी उत्पन्नाचे साधन बनू शकतो. पिठाच्या गिरणीच्या व्यवसायाचे महत्त्वमार्केट रिसर्च करा तुमच्या भागात पिठाची मागणी आणि स्पर्धा समजून घ्या. ग्राहकांना कोणत्या प्रकारच्या पिठाची गरज आहे ते ठरवा (गहू पीठ, मल्टीग्रेन, ज्वारी, बाजरी इ.). ग्राहकांना शुद्ध, दर्जेदार आणि चांगले पीठ मिळावे याची खात्री करा.

आटा चक्की व्यवसाय सुरू करण्याची पुढील पायरी म्हणजे व्यवसायाचा आकार ठरवणे. तुम्ही दोन प्रकारचे व्यवसाय सुरू करू शकता, एक मोठी पिठाची गिरणी किंवा छोटी पिठाची गिरणी . ते पिठाच्या उत्पादनावर अवलंबून असेल. छोट्या पिठाच्या गिरणीच्या व्यवसायासाठी मोठ्या गुंतवणुकीची गरज नसते. आपण ते थोड्या प्रमाणात सुरू करू शकता; तथापि, नफा देखील लहान असेल. एकदा तुम्ही व्यवसाय स्थापित केला आणि सातत्यपूर्ण ग्राहक मिळवले की, तुम्ही फायदेशीर उत्पन्न मिळवण्यास सुरुवात कराल. तुम्ही त्याच मशिनमध्ये मसालेही चक्की करू शकता आणि अधिक नफा मिळवण्यासाठी ते वेगळे विकू शकता. लहान-गिरणी व्यवसायांसाठी अधिक उत्पन्न मिळविण्यासाठी ही एक पर्यायी पद्धत आहे. दुसरीकडे, मोठ्या प्रमाणात पिठाची गिरणी अधिक फायदेशीर असते आणि त्यासाठी मोठ्या गुंतवणूकीची आवश्यकता असते. दळणाचे धान्य खरेदी करण्याऐवजी तुम्ही मोठ्या प्रमाणावर व्यवसायात कच्चा माल वापरून पीठावर प्रक्रिया करू शकता. म्हणून, पिठाच्या गिरणीचा व्यवसाय सुरू करण्यासाठी व्यवसायाचा प्रकार आणि आकार निश्चित करणे आवश्यक आहे.

**फायदे :-** १. सतत ग्राहकांची उपलब्धता. २. कमी गुंतवणुकीत व्यवसायाची सुरुवात. ३. लवकर ब्रेक-ईव्हन पॉइंट गाठता येतो. ४. घरबसल्या सुरू करता येणारा व्यवसाय.यामुळे पिठाच्या गिरणीचा व्यवसाय आत्मनिर्भर भारताच्या उद्दिष्टांनुसार चांगले उत्पन्न देणारा आणि टिकाऊ व्यवसाय ठरतो.





**व्यवसाय यशस्वी ते साठी ची गुरुकिल्ली**

- ✻ ग्राहकांच्या विशेष गरजा लक्षात घेऊन
- ✻ ग्राहकांच्या आवडीनिवडींना प्राधान्य द्या
- ✻ वेळोवेळी सवलती देत राहावे
- ✻ व्यवसायाचे वित्तीय व्यवस्थापन
- ✻ ग्राहकांसोबत चांगले संबंध तयार करा
- ✻ प्रभावी मार्केटिंग आणि ब्रँडिंग
- ✻ समस्याचे निर्मूलन
- ✻ नवीन तंत्रज्ञानाचा वापर
- ✻ उत्पादन किंवा सेवेची गुणवत्ता
- ✻ सतत शिकणे आणि सुधारणा
- ✻ जोखीम आणि आव्हाने स्वीकारा

**लोनच्याचा व्यवसाय :** लोणची ही भारतीयांची सर्वात आवडती डिश आहे, जी प्रत्येकाला आपल्या ताटात चाखायची असते. लोणचे तुमच्या जेवणाची चव तर वाढवतातच शिवाय ते अधिक स्वादिष्ट बनवतात. अशा परिस्थितीत विचार करा की तुम्ही भारतात उत्तम दर्जाचा लोणच्याचा व्यवसाय केला तर किती नफा कमावता येईल. जर तुम्ही लोणच्यामध्ये टेस्ट टिकवून ठेवू शकत असाल तर हा व्यवसाय खूप फायदेशीर आहे.

**मसाला व्यवसाय:-** आपल्या भारतात आणि जगात कोणताही कार्यक्रम असल्यास जेवण बनवण्यासाठी मसाल्यांची गरज पडत असते. तसेच सण, पार्टी, लग्न, कार्यक्रम, वर्धापनदिन इत्यादी कोणत्याही समारंभात पाहुण्यांसाठी खास जेवणाची व्यवस्था केली जाते. जेवण बनवण्यासाठी मसाल्यांचा वापर करूण जेवण रुचकर बनवतात. आगामी काळात मसाल्यांचा वापर आणखीनच वाढणार आहे आणि हे पाहता मसाल्यांचा व्यवसायही खूप चांगला व्यवसाय ठरू शकतो. मसाला उद्योग तुम्ही एकाच मशीनच्या सहाय्याने अनेक प्रकारचे मसाले बनवून आपला व्यवसाय सुरू करू शकता. सर्व प्रकारचे मसाले हे विविध भांज्यांसाठी लागत असतात, त्यामुळे त्यांची मागणी ही खूप मोठ्या प्रमाणात आणि प्राचीन काळापासून जगभर आहे. मसाले बारीक करून डब्यामध्ये किवा पॅकेट मध्ये पॅक केल्यास ते खराब होत नाहीत. कारण आगामी काळात मसाल्यांचा वापर आणखीनच वाढणार आहे आणि हे पाहता मसाल्यांचा व्यवसायही सर्वांसाठी खूप चांगला व्यवसाय ठरू शकतो. मसाला व्यवसाय हा कमी गुंतवणुकीतून सुरू करता येणारा व नेहमी मागणी असणारा व्यवसाय आहे. भारतीय स्वयंपाकात मसाल्यांना विशेष स्थान आहे, त्यामुळे स्थानिक व राष्ट्रीय पातळीवर या व्यवसायाला मोठी मागणी आहे. हा व्यवसाय लघुउद्योग म्हणून सहजपणे सुरू करता येतो.

**फायदे :** कमी भांडवलात व्यवसाय सुरू करता येतो. भारतात मसाल्यांना सतत मागणी असते. हळूहळू मोठ्या प्रमाणावर विस्तार करता येतो. महिलांसाठी घरी बसून सुरू करता येणारा व्यवसाय. हळद पावडर, मिरची पावडर, गरम मसाला, सांबर मसाला, चाट मसाला, भाजी मसाला, महत्त्वाचे मसाले आहेत. योग्य नियोजन, गुणवत्तापूर्ण उत्पादन, आणि चांगल्या मार्केटिंगद्वारे हा व्यवसाय यशस्वी होऊ शकतो.

शेवया बनवण्याचा व्यवसाय- शेवया बनवण्याचा व्यवसाय हा भारतात लोकप्रिय आणि नफा देणारा लघुउद्योग आहे. आपल्या देशात शेवया अनेक घरांमध्ये रोजच्या आहाराचा भाग असतात, विशेषतः सण-उत्सवांमध्ये त्यांचा जास्त वापर होतो. शेवया गोड पदार्थांसाठी तसेच मसालेदार डिशेससाठी उपयोगी पडतात, त्यामुळे त्यांची बाजारपेठ खूप मोठी आहे. हा व्यवसाय कमी भांडवलात सुरू करता येतो आणि त्यासाठी तांत्रिक कौशल्यांचीही फारशी गरज नसते. एकदा उत्पादनाची गुणवत्ता आणि चव लोकांच्या पसंतीस उतरताच, व्यवसाय वाढीस लागतो.

**शेवयांचे प्रकार :-** १. गोड शेवया, २. मसालेदार शेवया ३. हेल्दी व्हरायटी (बाजरी, ज्वारी, ओट्सचे) मोठ्या प्रमाणावर उत्पादनासाठी मशीनरी, भाडे, कामगार आणि पॅकेजिंगसाठी जास्त खर्च अपेक्षित आहे.जर नीट नियोजन केले तर शेवयांचा व्यवसाय कमी भांडवलात नफा देणारा ठरू शकतो.

आजकाल आरोग्याशी संबंधित प्रॉडक्ट्सची मागणी वाढत असल्यामुळे गहू, ज्वारी, बाजरी, रवा किंवा ओट्सपासून बनवलेल्या हेल्दी शेवयांना विशेष मागणी आहे. तसेच, हा व्यवसाय लहान गावांपासून मोठ्या शहरांपर्यंत कुठेही सुरू करता येतो, आणि लोकल तसेच ऑनलाइन मार्केटमधून विक्री करून अधिक नफा मिळवता येतो. शेवयांचा व्यवसाय केवळ कमाईचे साधनच नाही तर आत्मनिर्भरतेकडे एक पाऊलही ठरतो. योग्य नियोजन, गुणवत्ता, आणि मार्केटिंगद्वारे तो यशस्वीरीत्या वाढवता येतो. शेवयांचा व्यवसाय सुरू करण्यासाठी काही गोष्टींची तयारी आणि नियोजन आवश्यक आहे.

शेतकरी महिला या शेती सोबतच उपोरक्त गृहउद्योग करून स्वतः तर आर्थिक दृष्ट्या सक्षम होतीलच त्याचबरोबर स्वतःच्या कुटुंबास देखील आर्थिक सामाजिक दृष्ट्या सक्षम व प्रबळ करतील यात काही शंका नाही.



✻ ✻ ✻ ✻ ✻ ✻